201601051154162007

शासकीय कार्यालयांची कामकाजाची वेळ.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : समय-१०८८/१९/अठरा[र.व का.],
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३१ ऑगस्ट, १९८८.

वाचा : १. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-समय-१०८५/६४/१८[र.व का.], दि. १३ जून, १९८५.

२. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-समय-१०८५/६४/१८[र.व का.], दिनांक १२ फेब्रुवारी, १९८७.

शासन निर्णय :

शासकीय कार्यालयांना ५ दिवसांचा आठवडा दिनांक १ जुलै, १९८५ पासून लागू करण्याबाबतचे शासनाचे आदेश, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-समय-१०८५/६४/१८[र.व का.], दिनांक १३ जून, १९८५ अन्वये काढण्यात आले. सदर आदेश प्रशासकीय कार्यालयांपुरते जारी राहतील असे स्पष्टीकरणात्मक आदेश शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-समय-१०८५/६४/१८[र.व का.], दिनांक १२ फेब्रुवारी, १९८७ अन्वये काढण्यात आले.

२. शासन आता असे आदेश देत आहे की, पूर्वी ज्या प्रशासकीय कार्यालयांना ५ दिवसांचा आठवडा वरील आदेशाप्रमाणे लागू केला आहे अशी शासनाची सर्व प्रशासकीय कार्यालये, दिनांक १ सप्टेंबर, १९८८ पासून प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी बंद राहतील व इतर सर्व शनिवारी पूर्ण वेळ चालू राहतील.

कार्यालयीन कामकाजांच्या वेळा सध्याप्रमाणेच राहतील म्हणजे :-

[१] बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयांची कामकाजाची वेळ सोमवार ते शनिवार सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.३० पर्यंत राहील.

[२] बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालये वगळून इतरत्र शासकीय कार्यालयांची वेळ सोमवार ते शनिवार सकाळी १० ते ५.४५ पर्यंत राहील.

[३] बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयांतील शिपायांसाठी कामाची वेळ सोमवार ते शनिवार सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.१५ राहील.

[४] बृहन्मुंबई वगळून इतरत्र शासकीय कार्यालयांतील शिपायांसाठी कामाची वेळ सोमवार ते शनिवार सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.३० पर्यंत राहील.

[५] कार्यालयीन वेळेत भोजनाची सुट्टी अर्ध्या तासाची राहील.

३. ज्या शासकीय कार्यालयांना कारखाना अधिनियम किंवा औद्योगिक विवाद अधिनियम लागू आहे, किंवा ज्यांच्या सेवा अत्यावश्यक म्हणून समजल्या जातात अशा कार्यालयांना व शासकीय महाविद्यालये, तंत्र निकेतने यांना हे आदेश लागू राहणार नाहीत. अशा कार्यालयांची यादी सोबत जोडली आहे. ही यादी केवळ विशदीकरणात्मक [Illustrative] आहे, संपूर्ण [Exhaustive] नाही.

कृ.मा.प.

४. हे आदेश काढण्यामध्ये शासनाचा हेतू प्रामुख्याने, शासकीय कार्यालयांनी सर्वसाधारणत: एका आठवड्यामध्ये किमान ४० तास काम करावे हा आहे. सध्या ज्या शासकीय कार्यालयाचे कामाचे तास एका आठवड्यामध्ये ३० तासांपेक्षा कमी असतील अशा कार्यालयांच्या बाबतीत हे किमान ४० तास एवढे होण्यासाठी संबंधित कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख ह्यांनी उचित कार्यवाही करावी.

५. सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख ह्यांनी ह्या आदेशांचे कटाक्षाने अनुपालन करावे आणि त्याप्रमाणे दिनांक १ सप्टेंबर, १९८८ पासून हे आदेश लागू केले असल्या-बाबतचे अहवाल संबंधित प्रशासकीय मंत्रालयीन विभागांकडे पाठवावेत व मंत्रालयीन विभागांनी एकत्रित स्वरूपात हे अहवाल सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावेत.

६. कार्यालयीन कामकाजाबाबत ज्यांना पूर्वी ५ दिवसांचा आठवडा लागू केला आहे अशा कार्यालयांच्या बाबतीत ह्यापूर्वी शासनाने काढलेल्या सर्व आदेशांचे अधिक्रमण करून हे आदेश देण्यात येत आहेत. हे आदेश दिनांक १ सप्टेंबर, १९८८ पासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

[सी. डी. सिंग],

सचिव[प्र.सु. व र.व का.], महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,
अपर मुख्य सचिव,
शासनाचे सर्व विशेष सचिव/सचिव,
x सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
x निबंधक, उच्च न्यायालय[मूळ शाखा], मुंबई,
x निबंधक, उच्च न्यायालय[अपील शाखा], मुंबई,
x सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
x निबंधक, लोकआयुक्त, मुंबई,
x निबंधक, उप लोकआयुक्त, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र [१], मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र [२], नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
x महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे, चर्चगेट, मुंबई,
x महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, बोरीबंदर, मुंबई,
x महाव्यवस्थापक, बॉम्बे इलेक्ट्रिक सप्लाय ॲण्ड ट्रान्सपोर्ट अंडरटेकिंग, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग[१०/१० प्रती],
मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख,
निवड फाईल.

---

x पत्राने.

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१०८८/१२/१८[र. व का.], दिनांक ३१ ऑगस्ट, १९८८ चे सहपत्र.

यादी.

पाटबंधारे विभाग.

दापोडी, सातारा, वर्धा येथील कर्मशाळा.

अकोला, अहमदनगर, आष्टी, खडकवासला, नाशिक व नांदेड येथील प्रादेशिक कर्मशाळा.

नागपूर येथील शासकीय मध्यवर्ती कर्मशाळा, भंडारा येथील कर्मशाळा.

पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत क्षेत्रिय कामावरील/प्रकल्पावरील नियमित आस्थापना, रूपांतरीत स्थायी/अस्थायी आस्थापना, कार्यव्ययी आस्थापना व रोजंदारी आस्थापनावरील क्षेत्रिय कामगार/कर्मचारी.

सार्वजनिक आरोग्य विभाग.

हॅफकिन इन्स्टिट्यूट, नागपूर.

महसूल व वन विभाग.

बल्लारशाह, परतवाडा व डहाणू येथील एकात्मिकृत घटके, अल्लापल्ली येथील शासकीय मालकीची सॉ मील, विभागीय वन अधिकारी [वाहतूक व व्यापार] यांच्या अधिपत्याखालील परतवाडा व बल्लारशाह येथील वर्कशॉप, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे.

सामान्य प्रशासन विभाग.

शासकीय परिवहन सेवेचा कारखाना विभाग.

कृषि व सहकार विभाग.

दुग्धशाळा विकास विभागाअंतर्गत कारखाना अधिनियम लागू असलेल्या दूध योजना.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.

शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालयाअंतर्गत येणारी मुद्रणालये.

अत्यावश्यक सेवा.

शासकीय रुग्णालये/चिकित्सालये, पोलीस कारागृहे, पाणीपुरवठा प्रकल्प/योजना.

शैक्षणिक संस्था.

शासकीय महाविद्यालये, वैद्यकीय महाविद्यालये, शाळा, तंत्रनिकेतन.